2.1.2

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004
Phone : 0231-2609000 Special Cell –0231-260 9148.
Website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन ०२३१– २६०९००० विशेष कक्ष ०२३१–२६०९१४८
Estd : 1962
A++ Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

जा.क्र.विशेष कक्ष/2021-22/355-A

दिनांक : - 3 AUG 2021

प्रति,

१. मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२. मा. सचिव,
सर्व संलग्नित शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

३. मा. अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय : १. सन २०२१ – २०२२ या शैक्षणिक वर्षामध्ये संलग्नित महाविद्यालये / शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर अधिविभागातील विद्यार्थी प्रवेशामधील आरक्षण
२. सन २०२१ – २०२२ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी वसतिगृह (हॉस्टेल) प्रवेशाबाबत..

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात राज्य शासनाने अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये / संस्था यांच्यामधील विद्यार्थी प्रवेशासाठी विहित केलेल्या सामाजिक आरक्षणाची टक्केवारी ,खालीलप्रमाणे आपणांस योग्य त्या कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे.

| अ. क्र. | मागास प्रवर्ग | | आरक्षणाची विहित टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | SC | १३ % |
| २. | अनुसूचित जमाती | ST | ७ % |
| ३. | विमुक्त जाती (अ) | VJ-A | ३ % |
| ४. | भटक्या जमाती (ब) | NT-B | २.५ % |
| ५. | भटक्या जमाती (क) | NT-C | ३.५ % |
| ६. | भटक्या जमाती (ड) | NT-D | २ % |
| ७. | इतर मागासवर्ग | OBC | १९ % |
| ८. | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | EWS | १० % |
| ९. | खुला | Open | ४० % |
| | | एकूण | १०० % |

( टीप: १. संस्था / महाविद्यालयातील प्रवेशासाठीच्या जबाबदार अधिका–यांनी शासनाच्या विहित आरक्षण धोरणानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशामध्ये आरक्षण देण्याची कार्यवाही शेवटच्या प्रवेश दिनांकापर्यंत करावयाची आहे.

२. दि. ०५ मे, २०२१ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार एसईबीसी संवर्ग रद्द करणेत आलेला आहे. तथापि मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे जर बदल झाल्यास उपरोक्त आरक्षण टक्केवारीतही बदल होऊ शकतो.

**विद्यार्थी प्रवेशातील समांतर आरक्षणाबाबत :**

सामाजिक आरक्षणाबरोबरच खालीलप्रमाणे समांतर आरक्षण विद्यार्थी प्रवेशासाठी शासनाने निर्धारित केले आहे –

१. विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेमध्ये महिलांसाठी पदवीस्तरावर शासन निर्णय क्र. जीईसी –२००० (१२३/२००७)/टी.ई.१ दि. १७.०४.२००० नुसार ३० टक्के आरक्षण देय आहे.

(सोबत पृष्ठ क्र. ६ ते ७)